# प्रकरण पहिले

## "कादंबरीचे स्वरूप आणि ग्रामीण साहित्याचे विशेष"

## प्रकरण पहिले

## "कादंबरीचे स्वरूप आणि ग्रामीण साहित्याचे विशेष"

### अ नु क्र म णि का

१) कादंबरीचे स्वरूप

२) कादंबरीची व्याख्या

३) कादंबरी वाड्.मय व्यापक जीवनाचे दर्शन

४) कादंबरीचे घटक - १) कथानक, २) व्यक्तिचित्रण
३) वातावरण ४) भाषाशैली

५) मराठी कादंबरी उगम, वाटचाल व विकास

६) आजची कादंबरी

७) ग्रामीण साहित्य स्वरूप व वैशिष्टये

८) ग्रामीण संवेदनशीलता

९) प्रादेशिक साहित्य

१०) प्रादेशिक साहित्य संज्ञेची यथार्थता

११) प्रादेशिक कादंबरी

१२) प्रादेशिक साहित्याचे विशेष

१. ग्रामीण साहित्य आणि भौगोलिकता

२. ग्रामीण साहित्य आणि सामुदायिकता

३. ग्रामीण साहित्य आणि निसर्ग

४. ग्रामीण साहित्य आणि बोलीभाषा

५. ग्रामीण साहित्य आणि कृषिजीवन

६. ग्रामीण साहित्य आणि ग्रामीण संस्कृती, रूढी, परंपरा

१२) ७. ग्रामीण साहित्य आणि खेड्यांची रचना व ग्रामजीवन
८. ग्रामीण साहित्य आणि कुटुंबव्यवस्था.

१३) ग्रामीण व प्रादेशिक साहित्यातील साम्यभेद

१४) सा रां श

१५) सं द र्भ

......

# प्रकरण पहिले

## "कादंबरीचे स्वरूप आणि ग्रामीण साहित्याचे विशेष"

तात्त्विकदृष्टया या विश्वात कोणतीही गोष्ट अस्तित्वात येते, तेव्हा ती कोणत्या ना कोणत्या हेतूने अस्तित्वात येते. तिला तिचे असे एक उद्दिष्ट, गुणधर्म असतात. साहित्यकृतीही त्याला अपवाद नाही.

मराठी वाङ्.मयातील कादंबरी या वाङ्.मयप्रकाराच्या निर्मिती-प्रक्रियेचा विचार वेगवेगळ्या लेखकांच्या अनुषंगाने करता मराठीतील लेखक "रणजित देसाई" यांच्या "बारी" आणि "माझा गाव" या प्रादेशिक कादंबरीची रूपे वेगळी असल्याचे जाणवते. म्हणून या कादंब-याचे स्वरूप वैशिष्टये व वेगळेपणा कसे आहे, हे प्रस्तुत लघुप्रबंधात पहावयाचे आहे.

"बारी" आणि "माझा गाव" या दोन्ही वाङ्.मयकृती कादंबरी या वाङ्.मय प्रकारात मोडणा-या असल्यामुळे पहिल्यांदा कादंबरी या वाङ्.मय प्रकाराचे स्वरूप, व्याख्या, उगम, विकास, वाटचाल, तसेच या दोन्ही कादंब-या प्रादेशिक जीवनाचे चित्रण करणा-या असल्यामुळे ग्रामीण साहित्यात बसणा-या आहेत, म्हणून या पहिल्या प्रकरणात ग्रामीण साहित्याचे स्वरूप, प्रादेशिक साहित्य, ग्रामीण व प्रादेशिक साहित्यातील साम्यभेद, प्रादेशिक साहित्याचे विशेष इ. बाबींचा विचार करावयाचा आहे.

### कादंबरीचे स्वरूप:

कादंबरी या वाङ्.मय प्रकाराच्या स्वरूपाबद्दल मतैक्य नसल्यामुळे, कादंबरी या शब्दाबाबत तिच्या स्वरूपाबाबत तसेच तिच्या व्याख्येबाबत मतभिन्नता दिसून येते.

कादंबरी हा वाङ्.मय प्रकार इंग्रजी साहित्यात जन्माला आला. तसे पाहिले तर गोष्ट सांगणे आणि गोष्ट ऐकणे ही मानवाची प्रवृत्ती पुरातन आहे. पुराणे, आख्याने, बखरी इत्यादी मधून कादंबरीची काही अंगोपांगे जाणवतात हे खरे आहे. १८२९ मध्ये प्रसिध्द झालेल्या "महाराष्ट्र भाषेचा कोश" या ग्रंथात "कादंबरी" या शब्दाचे अर्थ देताना एक कल्पित कथा असा एक अर्थ दिला आहे. यावरून प्रा.सौ. कुसमावती देशपांडे यानी, "एका विशिष्ट त-हेच्या कल्पित कथेला "कादंबरी" हे नाव मराठीमध्ये ब-याच आधीपासून रूढ असावे"[१] असा जो तर्क केला आहे तो खरा असावा. इंग्रजीत "नॉव्हेल" हा शब्द कादंबरीच्या संदर्भात वापरला जातो, तर कधी "फिक्शन" हा शब्दही कादंबरीच्या संदर्भात वापरला जातो व त्यावरून कादंबरीच्या कल्पित व नवनिर्मित स्वरूपाची कल्पना येते. हिंदीत कादंबरीला "उपन्यास" म्हणतात. उपन्यास या शब्दाचा अर्थ जवळ ठेवणे अथवा समोर मांडणे असा आहे.

चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात की, "कादंबरी हा वाङ्.मयप्रकार इतका लवचिक, प्रसरणशील आणि सर्वसमावेशक आहे की, त्याचे स्वरूप सांगता आले तरी व्यवच्छेदक लक्षणांनी त्याच्या सीमारेषा निश्चित करणे कठीण आहे."[२]

अशा त-हेने कादंबरीचे स्वरूप वेगवेगळ्या विचारवंतानी सांगितले असले तरी काही व्याख्या वरूनही आपणास कादंबरीचे स्वरूप सांगता येईल.

कादंबरीची व्याख्या:

वरील कादंबरीच्या तात्त्विक विवेचनावरून गद्यात लिहिलेली काल्पनिक गोष्ट अशी कादंबरीची व्याख्या करता येईल. या प्रमाणे पुढील काही व्याख्या पहाता येतील -

व्याख्या:

१) "सत्य सृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून काल्पनिक पात्राची स्वभावचित्रे व काही अंशी तदवलंबित जीविते घटना यांचे गोष्टी रूपाने वर्णन करून कलाबंदाची प्राप्ती करवून, जीवनातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्य वाङ्मय विभाग."[३]

२) "एखाद्या व्यक्तीची विशिष्ट इच्छा अनेक अडचणीतून आणि संकटातून मार्ग काढून कशी सिध्दीस गेली, अगर तिची कशी मोडतोड झाली याची कहाणी म्हणजे कादंबरी."[४]

३) "कार्यकारण शृंखलाबध्द अशा कल्पित कथानकाद्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललित गद्य कथा म्हणजे कादंबरी."[५]

४) कादंबरी या वाङ्मयप्रकाराच्या गाभ्याचा निर्देश करणारी सर्वसमावेशक अशी व्याख्या करण्याचा प्रयत्न भालचंद्र नेमाडेंनी केलेला आहे. त्यांच्या मते - "कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्रांचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी अनेक पात्रे, प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत अशी साहित्यकृती असते. कादंबरी ह्या सर्व गोष्टींमुळे एखादी समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भासकट मांडलेला असतो. एखाद्या पोटसमुहाचे, पोटसंस्कृतीचे तपशिलासह दर्शन घडवलेले असते. संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा छेद घेतलेला असतो. आशयसूत्रे बळकट असतात, पात्रे सलग उभी राहतात."[६]

कादंबरी म्हणजे काय ? या प्रश्नाबरोबर तिच्या विविध पैलूंचे दर्शन घडविणाऱ्या अनेक व्याख्या नजरेसमोर येणे सहज शक्य आहे. पण त्यातल्यात्यात नेमाडयांच्या व्याख्येमध्ये अनेक वैशिष्टयांचा समावेश आहे. ही व्याख्या अत्यंत समर्पक व सार्थ आहे. म्हणूनच ती स्वीकारार्ह वाटते. नेमाडयांनी कादंबरीचे जे घटक मानले आहेत ते आशयसूत्रे, पात्रे, प्रसंग,

प्रदीर्घ अवकाश इत्यादी घटक हेच कादंबरीचे स्वरूप अधिक नेमकेपणाने स्पष्ट करणारे आहेत. कारण कादंबरीत त्रुटीततेपेक्षा वा खंडिततेपेक्षा प्रसंगाच्या परिपूर्ण चित्रणाची आवश्यकता अधिक दिसते. परंतु या प्राथमिक बाबी-पेक्षा आशयसूत्रांची विविधता ही कादंबरीची श्रेष्ठता वाढविण्यासाठी आवश्यक असलेली बाब आहे.

कादंबरीचे विषय तंत्र आणि मंत्र याबाबतीत कालानुरूप बदल होत गेले. आधुनिक युगाचे व्यापक चित्रण त्यात होवू लागले. आशय, मांडणी, ठेवण, विषय या गोष्टीचा विचार कादंबरीने केला. शेवटी असे म्हणावे वाटते की, "मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी एक ललित गद्य कथा म्हणजे कादंबरी" ही यथार्थ व्याख्या तिचे स्वरूप व विशालत्व स्पष्ट करण्यास समर्थ ठरेले असे वाटते.

कादंबरी वाङ्.मय व्यापक जीवनाचे दर्शन:

कादंबरी वाङ्.मय प्रकारास "जीवनाचा आरसा असे म्हणण्यात येते. परंतू मानवी जीवन इतके गुंतागुंतीचे आहे की, कादंबरी वाङ्.मय जीवनाचे प्रतिबिंब रूप असले तरी कोणातीही गोष्ट किंवा कृती जीवनाचे संपूर्ण प्रतिबिंब असणे शक्य नाही. कोणत्याही वाङ्.मयकृतीत जीवनाच्या लहानमोठ्या एखाद्या विभागाचीच छाया उमटून त्यावर परत लेखकाच्या व्यक्तित्वाचा परिणाम झालेला असतो. म्हणून कादंबरी हा वाङ्.मय प्रकार लवचिक, प्रसरणशील आणि सर्वसमावेशक आहे. त्यामुळे त्याचे स्वरूप सांगता आले तरी त्याच्या सीमारेषा निश्चित करणे कठीण आहे.

मानवी जीवन आणि भोवतालचा परिसर यांच्यात सतत संघर्ष चालू असतो. मानवी जीवन हे संघर्षमय असल्यामुळे जगण्यासाठी मानवाला सतत –

संघर्ष चालू असतो. मानवी जीवन हे संघर्षमय असल्यामुळे जगण्यासाठी मानवाला सतत धडपड करावी लागते, ' संघर्ष प्रयत्न करावा लागतो. हा संघर्ष व्यक्ती-व्यक्तीचा, व्यक्ती-समाज, व्यक्ती-निसर्ग अशा विविध स्वरूपांचा असतो. म्हणजेच मानवी जीवनाला अनेक पदर असल्यामुळे जीवनातले तरल क्षण पकडण्यापासून ते संपूर्ण समाज जीवनाचे दीर्घ कालीन जीवन चित्रण करण्याचे सामार्थ्य कादंबरीमध्ये असते. तसेच तिचे आवाहनही व्यापक व खोलवर असे सर्वसमावेशक असते. त्यामुळे साहित्याचे अंतर्गत प्रश्नही कादंबरीच्या क्षेत्रात उत्पन्न होतात व त्याचे विश्लेषण विवेचन सर्व वाङ्.मय प्रकारांना लागू होते.

कादंबरीचे घटक:

कादंबरीतील घटकांचे यथार्थ स्वरूप समजून घेणे हे कादंबरीच्या वाङ्.मय अभ्यासास तसेच कादंबरीचे मूल्यमापन व रसग्रहण करण्यास सोयीचे ठरते. कादंबरीच्या रचनेच्या दृष्टीने विचार करता - १) कथानक, २) व्यक्तिचित्रण, ३) वातावरण, ४) भाषाशैली हे कादंबरीचे महत्त्वाचे घटक मानता येतील. या घटकांचा विचार करू -

१) कथानक:

मानवी मनाला कोणत्याही प्रकारच्या रहस्याविषयी एकप्रकारचे नैसर्गिक कुतुहल असते. कादंबरीत अशाच एखाद्या रहस्याची निर्मिती करून कथानकात रंजकता आणली जाते. वाचकाची जिज्ञासा सतत जागृत केली जाते आणि मग पुढे काय ? हा वाचकाला प्रश्न पडतो. त्यातूनच मनात कुतुहल निर्माण होते. शेवटी वाचकाच्या मनातील कुतुहल आणि जिज्ञासा यांची पूर्ती होते. रंजनासाठी कादंबरीत घटनांची एक मालिकाच उभी केली जाते. एका घटनेतून दुसरी घटना, दुसरीतून तिसरी अशा घटना घडत जातात आणि या घटनांमुळेच कथानक पुढे सरकत जाते.

तंत्रदृष्टया मराठी कादंबरीत क्रमशः बरेच परिवर्तन झाले आहे. प्रारंभी कादंबऱ्या मुख्यत: आजीबाईंच्या भूमिकेवरून लिहिल्या जात व लेखकाचे अस्तित्व पदोपदी जाणवत असे. हरिभाऊंच्या युगात लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा लोप होऊ लागला. पण कथानक साधारण एक पदरी असे. आधुनिक कादंबरीककरांना तर कथानकाची मातबरी वाटतच नाही. उदा. भाऊ पाध्ये यांची वैतागवाडी, वासूनाका. व.ह. पिटके यांची शिदोरी, सुभाष भेंडे यांची अंधारवाटा या आधुनिक लेखकांनी कथानकाला कादंबरीत फारसे महत्त्व दिलेले दिसत नाही.

२) <u>व्यक्तिचित्रण:</u>

कादंबरीमध्ये व्यक्तिरेखा अथवा पात्र हा ही घटक महत्त्वपूर्ण असतो. कादंबरीकार एखाद्या व्यक्तीची उक्ती, विचार, क्रिया-प्रतिक्रिया जीवनदृष्टी यांच्या साहाय्याने त्या व्यक्तीची शाब्दरूप प्रतिमा तयार करीत असतो. ही प्रतिमा म्हणजेच व्यक्तिरेखा अथवा पात्र होय. अशा पात्रांची निर्मिती करणे म्हणजे व्यक्तिचित्रण होय.

कादंबरीमध्ये लेखक ज्या व्यक्तीरेखा उभ्या करतो, त्यांच्या स्वभावाचे विशेष वाचकांना वेगवेगळ्या प्रकारे कळत असतात. उदा. राग आल्यास डोळे वटारणे, दात ओठ खाणे, मुठी वळणे, शरीर थरथरणे, चेहरा लालबुंद होणे अशा क्रिया घडतात. स्वत: पात्र स्वत:बद्दल सांगताना त्याच्या स्वभावाचा दिसणारा गुण, दोन व्यक्तिरेखा एकमेकांशी बोलतात त्यातूनही एकमेकाच्या स्वभावाबद्दल वाचकांना माहिती मिळते. प्रत्येक पात्राची जीवनाविषयीची एक भूमिका असते. त्यानुसार त्याचे वर्तन, बोलणे, चालणे, चिंतन करणे, जीवनाविषयी मते व्यक्त करणे असे घडत असते. त्यातूनही त्या - त्या पात्राच्या स्वभावाची वैशिष्टये कळत असतात. या सर्वांमधून लेखकाचीही एक भूमिका प्रकट होते.

३) वातावरण:

कादंबरीत वातावरणालाही महत्त्वाचे स्थान आहे. वास्तविक पाहाता निसर्गाचा फार मोठा परिणाम, तसेच भोवतालच्या जगाचा परिणाम मानवी मनावर व जीवनावर घडतो. याचे दर्शन आपल्याला त्या - त्या कादंबरीमध्ये होते.

एकूण विचार करता असे दिसून येते की, कादंबरीतील वातावरण हे केवळ दुय्यम दर्जाचे अथवा प्रतिकात्म अर्थ सुचविणारे नसते. तर ते संबंध कादंबरीलाच व्यापून उरलेले असते. कथानकाची घडण ज्या भौगोलिक, सामाजिक वातावरणात करावयाची तशाच प्रकारचे परिणाम कादंबरीतील व्यक्तींना व घटनांना लाभत असते. हे वातावरण वजा करून कादंबरीतील व्यक्ती व घटना उभ्या राहणे शक्य नसते. म्हणून वातावरण हा ही कादंबरीचा महत्त्वाचा घटक आहे.

४) भाषाशैली:

इतर घटकाप्रमाणेच भाषा हा ही कादंबरीचा प्रमुख घटक आहे. लेखकाचा हेतू, दृष्टीकोण, आशय यांच्याशी सुसंगत अशीच त्याची भाषा असते. कादंबरीतील भाषा पात्राचे वय, लिंग, शिक्षण, संस्कृती, प्रदेश याला अनुसरून असायला हवी.

कादंबरीचे निवेदन करण्यासाठी कादंबरीकाराला सर्वस्वी भाषेवरच विसंबून राहावे लागते. कादंबरीकाराला लाभलेला विशिष्ट भाषेचा वारसा त्याच्या काळात अस्तित्वात असणारे व्यावहारिक व वाङ्मयीन भाषेचे स्वरूप ह्या सर्वांच्या परिपाकातून त्याची स्वत:ची "भाषा" घडत असते. त्यामुळे त्याने कोणत्याही प्रकारची कादंबरी लिहिली तरी त्याच्या व्यक्तित्वाचा ठसा त्या कादंबरीवर उमटतो. उदाहरणार्थ कादंबरीमध्ये त्या

अनेकविविध व्यक्ती असतात, त्यातील प्रत्येक व्यक्तीची भाषा वेगळी असते. तिच्या भाषेचे हे वेगळे पण कादंबरीकाराला आपल्या भाषासामर्थ्याच्या बळावर करावे लागते. एखादा कादंबरीकार हा ज्या वेळी स्वत:च्याच भाषाशैलीच्या मोहात अडकतो, त्यावेळी त्याच्या विशिष्ट भाषाशैलीमुळे त्याच्या सगळ्या कादंबऱ्या एकाच बाणाच्या, एकाच ढंगाच्या जाणवू लागतात. उदाहरणार्थ, वि.स. खांडेकरांच्या कादंबऱ्या. थोडक्यात, कादंबरीची "भाषा" ही कादंबरीकाराच्या अनुभवाभिव्यक्तीची भाषा असते. आणि म्हणून व्यावहारिक भाषेहून तिचे रूप वेगळे जाणवते.

मराठी कादंबरी उगम, वाटचाल व विकास:

१८१८ मध्ये पेशवाईचा हस्त होऊन इंग्रजांची राजवट सुरु झाली आणि इंग्रजी अंमलाने या देशात सामाजिक, आर्थिक, राजकीय व भौतिक इत्यादी क्षेत्रात परिवर्तन घडवून आणले. तसेच शिक्षण क्षेत्रातही परिवर्तन घडवून भारतीय साहित्यावरही इंग्रजी साहित्याचा प्रभाव झाला. शिक्षण व मुद्रण कलेचा विकास झाला त्यामुळे नवे-नवे शिक्षण मिळू लागले आणि साहित्याच्या विविध क्षेत्रात प्रगती होऊ लागली. त्याप्रमाणे कादंबरी वाङ्मयातही मोठ्या प्रमाणात प्रगती होऊ लागली.

"यात्रिक क्रमण" ही हरि केशवजी यांची मराठीत पहिली कादंबरी असली तरी कादंबरीच्या व्यवच्छेदक लक्षणावरून हा मान "बाबा पद्मनजी" यांच्या "यमुनापर्यटन" (१८५७) या कादंबरीला देण्यात येतो. या सामाजिक स्वरूपाच्या कादंबरीने मराठी कादंबरी वाङ्मयाची सुरुवात झाली असली तरी कादंबरीची भरभराट ही १८६१ साली प्रसिध्द झालेल्या लक्ष्मणशास्त्री हळबे यांच्या "मुक्तामाला" या अद्भूतरम्य कादंबरीने होय. तर "मोचनगड" ही रा.भि. गुंजीकरांनी ऐतिहासिक स्वरूपाची कादंबरी लिहिली आणि ऐतिहासिक कादंबरीचे पहिले मानकरी म्हणून त्यांचा उल्लेख करण्यात येतो.

"यमुनापर्यटन" ही मराठीतील पहिली सामाजिक स्वतंत्र व वास्तववादी कादंबरी आहे. या कादंबरीत महाराष्ट्रातील ब्राह्मण विधवांच्या करुण व शोचनीय अवस्थेचे चित्रण अत्यंत हृदयद्रावय केले आहे. या कादंबरीद्वारे बाबा पद्मनजी यांनी विधवांच्या अध:पतनाचा वास्तव विषय हाताळला आहे. कादंबरीची नायिका यमुना ही ध्येयवादी व निश्चयी आहे. समाज परिवर्तना-बद्दल तिच्या ठायी उत्कट आकांक्षा आहे.

यमुनापर्यटन प्रवृत्तीमध्ये हरिभाऊ, वा.म. जोशी, सानेगुरुजी, विभावरी शिरूरकर, भाऊ पाध्ये, अनंत कदम, दीनानाथ मनोहर इत्यादी लेखक येतात. असे भालचंद्र नेमाडे यांनी आपल्या निबंधात नमूद केले आहे. या लेखकांनी तत्कालीन सामाजिक प्रश्नाना वाचा फोडली आहे. उदा. बालविवाह, विधवा समस्या, सनातनी प्रवृत्ती, त्यागी देशसेवक, पुनर्विवाह इत्यादी विषय हाताळले आहेत.

१८६१ साली प्रसिध्द झालेली लक्ष्मणशास्त्री हळबे यांची "मुक्तामाला" ही पहिली अद्भूतरम्य कादंबरी. मुक्तामाला आणि तिचा पती घनशांकर यांच्यावर अनेक संकटे कोसळतात. धन आणि राजसत्तेच्या लोभाने कपट - कारस्थाने रचून शुक्लाक्ष मुक्तामालेला संकटात लोटतो. पण शेवटी या कपट-कारस्थानातून मुक्तामालेची सुटका होते. शुक्लाक्षादि खलपुरूषांचा पराजय कसा होतो असे हे कथानक आहे.

"मुक्तामाला" प्रवृत्तीत हळबे, रिसबुड, फडके, खांडेकर, माडखोलकर, भावे, पु.शि. रेगे, खानोलकर, रंगनाथ देशपांडे, माधव, कानिटकर, काकोडकर, योगिनी जोगळेकर, कुसुम अभ्यंकर चंद्रकांत खोत, बाबा कदम इत्यादी प्रवृत्तीच्या कादंबऱ्यातून जीवनाऐवजी वाङ्मयीन संकेतावर भर, अतिशयोक्ती, कृत्रिम अलंकृती, स्वभावदर्शनाचा अभाव, क्लिष्ट, पंडीती-वळणाची भाषा, वास्तवापासून दूर, अद्भूतरम्यता इत्यादीवर भर दिलेला दिसतो. असेही नेमाडे यांनी नमूद केले आहे.

रा.भि. गुंजीकरांच्या "मोचनगड" या ऐतिहासिक स्वरूपाच्या कादंबरीच्या प्रवृत्तीमध्ये वास्तवाचा आभास निर्माण करणारी वृत्ती दिसते. या प्रवृत्तीचे लेखन गुंजीकर, हरिभाऊ, चि.वि. वैध, नाथमाधव, हडप, वि.स. खांडेकर (ययाति) मनमोहन नातू, ना.स. इनामदार, रणजित देसाई, शिवाजी सावंत, गो.नि. दांडेकर, अनाळकर, धारप, सिनकर इत्यादी लेखकांनी लेखन केले आहे. या ऐतिहासिक प्रवृत्तीमुळे इतिहासाची पुनर्र आठवण, ऐतिहासीक व्यक्ती, काळ, भुभाग, बखर लेखन, काही ऐतिहासिक कादंबऱ्यांची भाषांतरे इत्यादीवर लेखन झाले. आणि ऐतिहासिक कादंबऱ्याचा एक नवा पायंडा या प्रवृत्तीमुळे पडलेला दिसतो. अशा प्रकारे नेमाडे यांनी मत व्यक्त केले आहे.

आजची कादंबरी:

आजच्या कादंबरीचा विषय आधुनिक मानवाच्या आशा आकांक्षाचे चित्रण करणे, त्याच्या वादळी जीवनाचे दर्शन घडविणे हा आहे. आजच्या कादंबरीचे स्वरूप अधिक विस्तृत व गुंतागुंतीचे होत आहे. विस्तृत व गुंतागुंतीच्या जीवनाचे चित्रण करीत असताना ज्या लेखकांजवळ त्या जीवनातील अनेकविध समस्याचे ज्ञान असेल, त्यालाच थोडेतरी यश मिळण्याची शक्यता आहे. यासाठी भरीव व्यासंग, चिकित्सकवृत्ती, व्यापक अनुभूती या गोष्टींची आवश्यकता आहे. तसेच ज्या जीवनाचे चित्रण कादंबरीकार करीत असतो त्याचा केंद्रबिंदू व्यक्ती असते. म्हणून कुसुमावती देशपांडे म्हणतात, " "व्यक्तिचित्रणातील समरसतेवर कादंबरीचा प्राण अवलंबून असतो. आजचा कादंबरीकार केवळ माणूस म्हणून माणसाजवळ जाऊ शकला तरच त्याला ही समरसता लाभणे शक्य दिसते."[७]

बांधेसूद रचनेच्या जुन्या कल्पना आता मागे पडत आहेत. भूमिका विकास, गुंफण, कळस आदी कथानकाच्या घाटासंबंधीचे जुने संकेत आता पाळले

जात नाहीत. प्रयोगवादी कादंबरीला तर वास्तविक पाहता कथानकाची गरज उरलेली नाही. कादंबरीचा प्रारंभ कोठेही होईल व कादंबरी कोठेही संपेल हे चित्र दिसते.

आजच्या मराठी कादंबरीचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे कादंबरीच्या कक्षा रुंदावत आहेत. भाषेच्या दृष्टीने आजच्या कादंबरीत नवीन प्रयोग होत आहेत. अंतर्मनातील खळबळ व्यक्त करण्यासाठी संज्ञाप्रवाही निवेदन पध्दतीचा अवलंब केल्याने वाक्यरचनेत सकृतदर्शनी तुटकपणा जाणवतो. "कोसला", "स्वप्नदोष", "वासुनाका" या कादंबऱ्यांची भाषाशैली रूढ कादंबरीतील पध्दतीपेक्षा वेगळी आहे. स्वभावरेखनाच्या दृष्टीने विचार केला तर पात्र चित्रणात आता बहिरंगापेक्षा अंतरंगाकडे भर देण्याकडे लेखकाचा कल अधिक दिसतो. चालू शतकाच्या चौथ्या दशकापासून मराठी कादंबरीत मनोविश्लेषणाला महत्त्व आल्यानंतर हे परिवर्तन घडून आले आणि त्याचेच विकसित रूप आजच्या कादंबरीत दिसत आहे. उदा. विश्राम बेडेकरांनी मनोविश्लेषणाला महत्त्व देऊन अंतर्मनातील कल्लोळ "रणांगण" कादंबरीत चित्रित केला.

## ग्रामीण साहित्य स्वरूप व वैशिष्टये:

"ग्रामीण साहित्य" या बाबत विचार करता, "ग्रामीण साहित्य" म्हणजे काय ? ग्रामीणांनी लिहिलेले काय ? ग्रामीणांबद्दल लिहिलेले काय ? की ग्रामीणांकरिता लिहिलेले असे अनेक प्रश्न निर्माण होतात. यावरून ग्रामीण साहित्य हा शब्द "ग्रामीण संवेदनेशी" निगडित आहे. मानवी जीवनातील बऱ्हंशी सुखदु:खे ही त्यांच्या भोवतालची विशिष्ट परिस्थिती, स्थल, काल व स्वभाव यांच्या संबंधातून निर्माण झालेली असतात. म्हणून "खेडेगाव, तेथील जीवनपध्दती, तेथील अशा खास रिती, शेती,

निसर्गाशी, मातीशी असलेली मानवी पण प्रदेशानिष्ट वैशिष्टपूर्ण संबंध तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्टये, मानवी जीवनाला त्या - त्या प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक धार्मिक, ज्ञानाविषयक मर्यादा व त्यातून उद्भवणारे प्रश्न आणि समस्या या सा-यांना आनंद यादव यानी "ग्रामीण" ही संज्ञा दिली आहे."[८]

कृषिकेंद्रित रचना हे ग्राम संस्कृतीचे वैशिष्टये असते. भारत हा कृषि-प्रधान देश आहे. जवळ-जवळ ७० ते ८० टक्के लोक ग्रामीण भागात रहातात. ग्रामीण विभागात शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे. त्यामुळे शेतकरी हाच समाज रचनेचा केंद्रबिंदू आहे व ग्रामीण समाजातील इतर घटक त्याच्या भोवती फिरत असतात. बारा बलुतेदार आणि शेतकरी यांचा एकमेकावर आधारीत असा संबंध निर्माण झाला. यावरून ग्रामीण जीवनातून आकाराला येणारे, ग्रामीण जीवनातील वास्तवाचे दर्शन घडविणारे आणि ग्रामीण जीवनाशी संबंधित असणारे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य असे आपल्याला म्हणता येईल.

## ग्रामीण संवेदनशीलता:

ग्रामीण साहित्याचा अस्सलपणा ठरविण्यासाठी ग्रामीण साहित्याची "ग्रामीण संवेदनशीलतेची" संकल्पना गो.मा. पवार यांनी मांडली ती प्रस्तुत संदर्भात स्वीकारण्याजोगी वाटते. त्यांच्या मते "ग्रामीण साहित्य" ही वर्णनपर संज्ञा आहे. ग्रामीणत्वाला स्वत:सिध्द असे मुल्य नाही. कलात्मकतेचे वेगळे निकषही असू शकत नाहीत. ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा अन्य साहित्याहून सर्वस्वी भिन्न आहेत. त्याचे स्वरुपही भिन्न आहे. म्हणून त्याच्या मुल्यमापनाचे निकषही वेगळे असावयास पाहिजेत असा दावाही कोणी करीत नाही वा करू शकत नाही. ऐतिहासिक, सामाजिक ही विशेषणे

केवळ वर्ण्य विषयांचा निर्देश करतात. त्याप्रमाणे ग्रामीण हे विशेषण विशिष्ट लेखनात कशाचे चित्रण आहे याचाच फक्त निर्देश करते. म्हणून "ग्रामीण जीवनाचे, मनाचे चित्रण करणारे साहित्य ते "ग्रामीण" साहित्य म्हणता येते."[९]

ग्रामीण जीवनपध्दती ही एक सामुहिक जीवनपध्दती असते. त्यामुळे जीवन जगणे हा ग्रामीण जीवनपध्दतीचा महत्त्वाचा गाभा आहे. समाजातील सगळेजण एकमेकाशी नात्यागोत्याच्या संबंधाने बांधलेले असतात. यातूनच त्यांच्यामध्ये एकमेकाबद्दल प्रेम निर्माण होते. या जीवनातून निर्माण होणारे साहित्य हे चिरंतन साहित्य होय. "ग्रामीण साहित्य" ही संकल्पना एखाद्या प्रदेशांतर्गत जीवनातून निर्माण झालेल्या साहित्याला योजली जाते. त्या साहित्यात त्या प्रदेशातील वास्तव जीवनाचे प्रतिबिंब पडलेले असते. त्यामुळे "ग्रामीण साहित्य" वर सुचविल्याप्रमाणे ग्रामीण मनाचा, अनेक ताणतणावासह शब्दरुप झालेला एक सांस्कृतिक ठेवा असतो. तो त्या प्रदेशाचा चालताबोलता मानसिक इतिहास असतो.

ग्रामीण साहित्याला "ग्रामीण" हे विशेषण सार्थ करावयाचे असेल तर ग्रामीण साहित्यिकावर एक जादा जबाबदारी येऊन पडते. तो जे विशिष्ट प्रदेशांतर्गत ग्रामीण साहित्य निर्माण करीत असतो त्या प्रदेशातील समाजात व तेथील मानवी मनात जी विविध प्रकारची स्थित्यंतरे कालाच्या ओघात होतात त्याचे भान त्याला ठेवावे लागते. स्थित्यंतर होणाऱ्या समाजात वातावरणाचा परिणाम तेथील मानवी मनावर होत असतो. दुसऱ्या बाजूने वातावरणावरही परिणाम घडवून आणावे लागतात. आणि वातावरण आपणास अनुकूल करुन घ्यावे लागते. तसेच तेथील बोलीचाही परिणाम होत असतो. या सर्वांचा परिणाम त्या विशिष्ट कालात निर्माण होणाऱ्या ग्रामीण साहित्यात प्रतिबिंबित व्हावा अशी अपेक्षा स्वाभाविकपणे निर्माण होते.

## प्रादेशिक साहित्य:

प्रादेशिकता म्हणजे नैसर्गिक व सांस्कृतिक वातावरणाला महत्त्व देणारी प्रवृत्ती आहे. प्रादेशिकता म्हणजे एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, भाषा, परंपरा, सामाजिक जीवन व निसर्ग यांच्या वर्णनामुळे त्या प्रदेशाला लाभलेले असामान्य वेगळेपण होय. साहित्यात ही वैशिष्ट्ये आली की, ते साहित्य प्रादेशिक समजले जाते. म्हणून स.शि. भावे यांनी म्हटले आहे. प्रादेशिकतेच्या कसोटयात स्थल, काल या बरोबरच वातावरणालाही महत्त्व असते. "हे वातावरण साहित्यात जे जिवंत होते ते पात्राच्या स्वभावातून आणि कृतीतून, पात्राचा स्वभाव आणि कृती स्वाभाविकपणे संबंध - रूप असतात. म्हणून पात्र जिवंत व्हायचे तर हा संबंध जिवंत व्हावा लागतो. जिवंत वातावरणाचे महत्त्व या दृष्टीने आहे."[१०] म्हणून प्रादेशिक साहित्यात वातावरणालाही महत्त्वाचे स्थान आहे.

मराठीत प्रदेश हा शब्द प्रांत अशा अर्थाने वापरला जातो. प्रदेश म्हणजे भूभाग आणि एका भूभागाची, तेथील जीवनाची वैशिष्टये म्हणजे प्रादेशिकता. हे जीवन ज्या साहित्यात चित्रित झालेले असते त्या साहित्याला "प्रादेशिक साहित्य" असे म्हणतात. व्यवहारातील प्रदेश भौगोलिक आणि राजकीय क्षेत्रात विभागलेला एक घटक असतो, तर साहित्यातील प्रदेश मात्र सामाजिक आणि सांस्कृतिक धाग्यांनी विणलेला असतो.

## "प्रादेशिक साहित्य" संज्ञेची यथार्थता:

प्रादेशिक साहित्य ही संज्ञा व्यापक आहे. प्रादेशिक साहित्यात ग्रामीण व जानपद संबोधल्या गेलेल्या साहित्याचाही अंतर्भाव होतो. कारण प्रदेशाच्या एका मोठया खंडात लहानमोठया खेडयांचा समावेश होतो. अशा अनेक ग्रामवैशिष्टयांचेच व्यापक रूपाने प्रदेश वैशिष्ट्य तयार होत असते.

प्रादेशिकतेत "ग्रामीण स्वरूपाचे लोकजीवन" असा अर्थ अभिप्रेत असल्यामुळे अशा साहित्यातून शहरी जीवन चित्रण येऊ नये अशी अपेक्षा असते. ग्रामीण पारंपरिक वैशिष्टयांपासून शहरे दुरावलेली असतात. त्यामुळे भौगोलिकदृष्टया शहरांचा अंतर्भाव प्रदेशात होत असला तरी प्रादेशिक साहित्यातून शहरांना दूर ठेवणे अभिप्रेत असते. त्याचप्रमाणे शहरी झोपडपट्टी जीवनचित्रणेही प्रादेशिकतेत येऊ नये, कारण शहरी संस्कृतीमुळे व भांडवलशाही कारखानदारी शोषणातून निर्माण झालेले दारिद्र्य म्हणजे हया झोपडपट्टीतील बकाल जीवन होय. सतरा गावची माणसे उद्योगाकरिता शहरात आलीत. आपल्या निवासाचा प्रश्न त्यांनी दिसेल तेथे मोकळ्या जागेवर झोपडया बांधून पोटाची भूक भागविली. त्यांच्या समस्या वेगळ्या, भाषा, संस्कृती वेगळी. अनेक प्रदेशातील माणसे एकत्र आल्याने त्यांची बोली ही संमिश्र स्वरूपाची असते. झोपडपट्टीतील हे जीवन जसे प्रादेशिक जीवनाहून वेगळे तसेच शहराच्या सानिध्यात राहूनही शहरी जीवनाहून वेगळे असते. पण आनंद यादवाच्या मते, "शहरी, ग्रामीण हे भाग जरी आपण वेगवेगळे मानत असलो तरी आपण सर्व महाराष्ट्रीय म्हणूनही एक आहोत. महाराष्ट्रीय म्हणून आपली संस्कृती रीतीरिवाज, देव-देवता एक असतात. मराठी माणसाची विशिष्ट गोष्टींच्या बाबतीत विशिष्टच प्रतिक्रिया होत असते. त्यामुळे आपल्या नागर वा ग्रामीण जीवनात ब-याच गोष्टी समान असल्यासारख्या दिसतात."[११] म्हणजे प्रादेशिक म्हणजे ग्रामीण स्वरूपाचे लोकजीवन हे जर त्यांना मान्य आहे तर ग्रामीण या वेगळ्या संज्ञेचे प्रयोजन काय ? कारण प्रादेशिकतेतच ग्रामजीवनाचा अंतर्भाव होतो.

## प्रादेशिक कादंबरी:

प्रादेशिक कादंबरीत प्रदेशनिष्ट जाणिवांचे दर्शन अपरिहार्यपणे घडावे हे अपेक्षित असते. भौगोलिकता, मागासलेपणा, निसर्ग, सामुहिकता, भाषा इत्यादी प्रादेशिकतेच्या तत्त्वांचो योजना कमी अधिक प्रमाणात

झालेली असते. विशिष्ट भूप्रदेशाचे, तेथे वास्तव्य करणाऱ्या लोकजीवनाचे, सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्टयांचे, त्या लोकांच्या समस्या, चालीरीती, रूढी, परंपरा, सणवार, उत्सव अंधश्रध्दा इत्यादींचे वास्तवपूर्ण चित्रण करणाऱ्या कादंबरीला प्रादेशिक कादंबरी म्हणता येईल. प्रादेशिकतेच्या आधारे जीवनाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न प्रादेशिक कादंबरी करते.

प्रादेशिकतेचा गुण असलेली पहिली कादंबरी "पिराजी पाटील" हरिभाऊंचे समकालीन "धनुर्धारी" (रामचंद्र विनायक टिकेकर) यांनी सन १८९९ मध्ये लिहिली. त्यानंतर सन १९४० पर्यंतच्या कालखंडात प्रादेशिकतेची बीजे असलेल्या अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. त्यात खेडूत कादंबरीकार म्हणून गौरविल्या गेलेल्या ना.वि. कुलकर्णी यांचा नामनिर्देश उल्लेखनीय आहे. त्यांच्या "शिपाई", "पैसा", "दिवस कसे जातील" या कादंबऱ्यांमधून अंशिक रूपाने प्रादेशिकतेचे दर्शन घडते. याशिवाय बेरेरकर, रामतनय, दा.न. शिखरे इत्यादींनी काही प्रादेशिक कादंबऱ्या लिहिल्या. परंतु त्यामागे गांधीवादी व मार्क्सवादी प्रेरणा होत्या. तसेच शहरी दृष्टिकोन आणि प्रचाराची भूमिका होती. सन १९४० मध्ये र.वा. दिघे यांची "पाणकळा" प्रसिध्द झाली ती प्रादेशिकतेचा संपूर्ण साज घेऊनच उतरली. त्यानंतर "सराई", "पडरे पाण्या", "आई आहे शेतात", इत्यादी प्रादेशिक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. ग.ल. ठोकळ, वि.ल. बर्वे, ना.के. महाजन, वि.द. चिंदुरकर, शं.रा. भिसे, श्रीराम अत्तरदे, वि.वा. हडप इत्यादींनी प्रादेशिक कादंबऱ्यामध्ये भर घातली.

प्रादेशिक कादंबरीच्या नव्या पर्वाचा प्रारंभ दांडेकर, पेंडसे यांनी केला. दांडेकरांनी "शितू", "पवनाकाठचा धोंडी", "पडघवली", "पूर्णामायची लेकरे", "माचीवरला बुंधा", "जैत - रे - जैत", "मृण्मयी" इत्यादी

कादंब-यामधून कोकण प्रदेश साकार केला आहे. याशिवाय कलात्मक अलिप्ततेने वास्तवाचे दर्शन घडविणा-या काही कादंब-या लिहिल्या गेल्या. त्यात "वाळगीण" (वा.ब. कर्णिक), "बळी" (विभावरी शिरूरकर) "वैजयंता", "फकिरा" (अण्णाभाऊ साठे), "बनगरवाडी" (व्यंकटेश माडगूळकर), "माझागाव", "बारी" (रणजित देसाई), "धग", "डाळिंबाचे दाणे" (उध्दव शेळके) इत्यादी कादंब-यांचा समावेश होतो. त्यानंतर महादेव मोरे (पाव्हना), रा.र. बोराडे (पाचोळा), आनंद यादव (गोतावळा), इत्यादी प्रदेश बोलीतून कादंबरी लेखन करणारे लेखक आहेत. चि.त्र्यं. खानोलकरांची "चानी" ही कादंबरी म्हणजे प्रादेशिक पातळी-वरील मानवी विकार, क्रौर्य स्वार्थ यांचे चित्रण करणारी काव्यात्मक अशी कादंबरी आहे. याखेरीज दि.वि. जोशी यांच्या (जागवेला, सरवा, येरझार), शंकर खंडू पाटील (घुंगरू, सरपंच व कुलपती), ना.धो. महानोर (गांधारी) इत्यादी कादंबरीकारांनी प्रादेशिक कादंब-या लिहिल्या आहेत.

सारांश, मराठी साहित्यात प्रादेशिकतेची प्रवृत्ती वाढत आहे. कवितेच्या तुलनेत कथा व कादंबरी साहित्यात ती आता येत आहे. कादंबरीचा आवाका मोठा असल्यामुळे जीवनाची सर्वांगे व्यापून टाकण्याची तिची क्षमता अधिक असल्यामुळे प्रादेशिकतेचे अनेक अंगी स्म प्रादेशिक कादंबरीतच आढळते. त्याखालोखाल प्रादेशिकतेचे दर्शन घडते ते कथा वाङ्.मयात. कवितेतील प्रादेशिकतेची प्रवृत्ती म्हणावी तेवढी वृध्दिंगत झालेली दिसत नाही. कदाचित कविता या वाङ्.मय प्रकाराची मर्यादाही याला कारणीभूत असेल. असे असले तरी प्रादेशिकतेची ही प्रवृत्ती मराठी मातीशी मराठी मनाशी नाते सांगणारी असल्यामुळे इतर प्रवृत्तीच्या तुलनेत प्रादेशिक प्रवृत्तीचा प्रवाह मराठी साहित्यात लोकप्रिय झालेला दिसतो.

प्रादेशिक साहित्याचे विशेष:

## प्रादेशिक साहित्याचे विशेष:

### ग्रामीण साहित्य आणि भौगोलिकता:

विशिष्ट भूभागचे चित्रण असणे हा प्रादेशिक साहित्याचा महत्त्वाचा गुणधर्म आहे. प्रदेश म्हणजे भूभाग आणि एका भूभागाची, तेथील जीवनाची वैशिष्टये म्हणजे प्रादेशिकता. प्रादेशिकतेत सर्वप्रथम जाणवणारी गोष्ट म्हणजे भौगोलिकता. प्रत्येक प्रदेशाचे त्याच्या वेगळ्या अस्तित्वामुळे एक वेगळे वैशिष्टय असते. मराठीत प्रदेश हा शब्द प्रांत अशा अर्थाने वापरला जातो. हा प्रदेश यंत्रयुगापासून आणि सोयीसमृध्दी-पासून अत्यंत दूर आणि आडवळणी असतो. प्रादेशिक जीवन ज्या साहित्यात चित्रित झालेले असते त्या साहित्याला "प्रादेशिक साहित्य" असे म्हणतात. व्यवहारातील प्रदेश भौगोलिक आणि राजकीय क्षेत्रात विभागलेला असतो, तर साहित्यातील प्रदेश मात्र सामाजिक आणि सांस्कृतिक धाग्यांनी विणलेला असतो. रहात असलेल्या भूभागाच्या सततच्या सहवासाने मनुष्याच्या मनात आपल्या प्रदेशाविषयी जवळीक, प्रेम, आपुलकी निर्माण होते. यातुनच प्रादेशिक साहित्य निर्माण होते. म्हणजे प्रादेशिक साहित्यात एक संपूर्ण प्रदेशाच्या प्रदेश महत्त्वाचा ठरतो. त्या संबंध प्रदेशाचे मिळून जे चित्रण झालेले असते ते महत्त्वाचे असते.

### ग्रामीण साहित्य आणि सामुदायिकता:

साहित्यामध्ये भौगोलिक प्रदेशाला जसे महत्त्व आहे, त्याप्रमाणेच सामुदायिकतेलाही महत्त्व आहे. शहरी माणसाशी तुलना करता ग्रामीण माणूस हा समाजाचा एक घटक म्हणून समाजाशी अधिक बांधलेला असतो. संपूर्ण गाव जणूकाही एक मोठे कुटुंबच आहे अशी ग्रामीण समाजाची रचना असते. गावातील एकाचे दु:ख ते सगळ्या गावाचे दु:ख असते. गावातल्या गावात भांडणे असली तरी संकट काळी सारा गाव एक होतो आणि संकट

दूर करतो. सण, उत्सव, लग्नकार्य या प्रसंगी सारा गाव एकत्र येवून कार्य करतो. यात्रेतील कुस्त्या, वेगवेगळ्या प्रकारच्या शर्यती, यात्रेतील खेळ या सर्वात गावकरी आनंदाने सहभागी होतात. यातूनच त्यांच्यामध्ये एकमेकाबद्दल प्रेम निर्माण होते. खेड्यातील प्रत्येक माणसाला एकमेकाशी बांधल्याची जाणीव असते. या सर्वाचे चित्रण ग्रामीण साहित्यात होते.

## ग्रामीण साहित्य आणि निसर्ग:

प्रादेशिक साहित्यात निसर्गाला महत्त्वाचे स्थान असते. डोंगर, नद्या, द-या, झाडे, ओढे, विहीरी, पिके, पायवाटा, पानंद या सर्वातून हा निसर्ग दिसून येतो. खरी भारतीय संस्कृती या खेड्यातच पहायला मिळते. भारत हा खेड्यांचा देश आहे. ही खेडी निसर्गाच्या तालावर जगत असतात. भारतीय शेती पावसावर अवलंबून आहे. पाऊस पडला तर हा निसर्ग फुलतो. मग ग्रामीण जीवनही फुलते. पाऊस नाही पडला तर हे ग्रामीण जीवन कोमेजून जाते. म्हणून मानवी जीवनापासून निसर्ग वेगळा करता येत नाही. याकरिता प्रादेशिक साहित्यात निसर्ग चित्रण प्रभावी असायला हवं.

## ग्रामीण साहित्य आणि बोली भाषा:

ग्रामीण साहित्याचे प्रत्ययकारी चित्रण ग्रामीण बोली भाषेतूनच होते. स्थानिक भाषेला ग्रामीण साहित्यात महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. ग्रामीण माणसाच्या जीवनाचे चित्रण बोलीभाषेद्वारेच होते. ग्रामीण भाषा ग्रामीण अनुभवाशी निगडीत असते. ग्रामीण संवादातून व्यक्तिचित्रणे नेटपणे उभी राहतात. ग्रामीण जीवन आणि ग्रामीण भाषा याचा निकटचा संबंध असतो. ग्रामीण साहित्य ज्या भाषिक द्रव्यातून आकाराला येते त्या बोली भाषेला साहित्यात मानाचे स्थान आहे. ग्रामीण साहित्याची भाषा, त्यातून प्रकट होणारे ग्रामीण जीवन, शिव्या, म्हणी, वाक्प्रचार यातून ते स्पष्ट

दिसते. म्हणून अस्सल ग्रामीण कलाकृतीत ग्रामीण बोली आढळतेच. बोलीतला रांगडेपणा वाचकाला आवडू लागला. त्यामुळे बोलीचा मोकळेपणा, रोखठोखपणा दिसून येतो. म्हणून ग्रामीण साहित्यात ग्रामीण जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण ग्रामीण भाषेच्या द्वारेच होऊ शकते. ग्रामीण साहित्यातील निवेदन मात्र प्रमाण भाषेत असणे स्वाभाविक स्वरूपाचे असते.

ग्रामीण साहित्य आणि कृषिजीवन:

भारतीय ग्रामीण संस्कृती ही प्रामुख्याने प्राचीन काळापासून कृषिकेंद्रित संस्कृती आहे. कृषिकेंद्रित रचना हे ग्राम संस्कृतीचे प्रमुख वैशिष्टय होय. म्हणून शेती आणि शेतकरी हा ग्रामसंस्कृतीचा प्रमुख घटक म्हणता येईल. शेतावर पिकणारी पिके व आसपासचा निसर्ग यांनी ग्रामीण साहित्यातील वातावरण भरून गेलेले असते. शेतकरी वर्षभर आपल्या शेतात राबत असतो. उन्हाळा, पावसाळा हिवाळा या ऋतुचक्राप्रमाणे तो आपल्या शेतामध्ये पीके घेतो. दुष्काळ, महापूर, जंगली जनावरे, किडे, रोगराई यांना तोंड देत आपले जीवन जगतो.

एकूण, ग्रामीण जीवनामध्ये शेती, शेतीशी निगडित निसर्ग, कालचक्र, जनावरे, पिके, गावातील आलुते-बलुतेदार या सर्व घटकांचा समावेश आपण कृषिसंस्कृतीत करतो. त्यामुळेच या सर्व घटकांभोवती लेखक आपले विचार साहित्यातून मांडतो.

ग्रामीण साहित्य आणि ग्रामीण संस्कृती, रूढी, परंपरा:

ग्रामीण साहित्यात संस्कृतीला, रूढी, परंपराना अनन्यसाधारण महत्व आहे. निसर्गावर अवलंबून असतो. ग्रामीण लोकांच्या जीवनात अंधश्रध्दा रूढी, परंपरा, चालीरीती याना महत्व असते. यांच्या विरूध्द जो जाईल त्याला गावातील लोक वाळीत टाकतात. त्यामुळे ग्रामीणांचे सण, उत्सव,

देव-देवता, पुजा-अर्चा हे सर्व विशिष्ट रीतीरिवाजाप्रमाणे करतात. यातूनच त्यांची संस्कृती आकाराला येते. याचे चित्रण ग्रामीण साहित्यात होते.

ग्रामीण साहित्य आणि खेड्यांची रचना व ग्राम जीवन:

निसर्गाच्या सानिध्यात ग्रामीण खेडी वाढत असतात. प्रत्येक गावामध्ये अनेक जातीजमातीचे लोक राहात असतात. त्यामुळे खेड्याची रचना शहरी रचनेपेक्षा भिन्न असते. गावातील रस्ते, घरे, चावडी, देवाचे मंदीर, तालमी, गुरांचे गोठे यांची रचना विशिष्ट प्रकारे केलेली असते. तसेच गावातील पाटील, कुलकर्णी, चौगला, लोहार, सुतार, महार, चांभार, कुंभार, न्हावी, परीट, गुरव, कोळी, तांबोळी, तेली, साळी, माळी, धनगर, गोंधळी शिवाय फिरस्ते या सर्वांतून ग्रामीण जीवन व त्याची रचना दिसून येते. याचेही चित्रण ग्रामीण साहित्यात दिसून येते.

ग्रामीण साहित्य आणि कुटुंबव्यवस्था:

ग्रामीण साहित्याचा विचार करीत असताना कुटुंबव्यवस्था हा ही साहित्याचा महत्त्वाचा विशेष गुण आहे. खेड्यातील कुटुंब व्यवस्था ही एकत्र कुटुंब व्यवस्था असते. या एकत्र कुटुंब पध्दतीमध्ये कुटुंब प्रमुखाला महत्वाचे स्थान असते. कुटुंब प्रमुखाच्या शब्दाच्या पुढे कुटुंबातील इतर लोक जात नाहीत. (उदा. "माझा गाव" रणजित देसाई)

ग्रामीण समाज व्यवस्था ही कृषिनिष्ठ असल्यामुळे शेतीतील कामे करण्यासाठी माणसांची आवश्यकता असते. एकत्र कुटुंबपध्दतीमध्ये कुटुंब मोठे असल्यामुळे ती कामे लवकर होतात. घरातील कोणतेही कार्य असले तरी सारे कुटुंब त्या कार्यात ओढले जाते. पूर्वीपासून त्या कुटुंबाच्या ज्या

रूढी परंपरा चालत आलेल्या असतात त्या सर्वांना पाळाव्या लागतात. ग्रामीण जीवनात कुटुंबाला महत्त्वाचे स्थान असते. त्यामुळे ग्रामीण साहित्यामध्ये कुटुंबाचे चित्रण येणे अपरिहार्य असते.

## ग्रामीण व प्रादेशिक साहित्यातील साम्यभेद:

"ग्रामीण साहित्य" आणि "प्रादेशिक साहित्य" यांचा आढावा घेतल्यानंतर या दोन साहित्यामध्ये काही साम्यभेद आढळतात ते आता पाहू-

"ग्रामीण साहित्य" आणि "प्रादेशिक साहित्य" यामध्ये काहींनी भेद केलेला आहे. प्रादेशिक ही संज्ञा ग्रामीण या संज्ञेपेक्षा जास्त व्यापक आहे. असेही काहींचे मत आहे. पण परिसर म्हणजे प्रदेश हे मान्य असल्यास ग्रामीण व प्रादेशिक या दोन्हीही संज्ञा तशा समानार्थीच आहेत. "ग्रामीण कथा आणि प्रादेशिक कथा यात म्हटला तर व्याप्तीचाच फरक आहे."[१२] असे म्हणून दोहोतील साम्यावर इंदूमती शेवडे यांनी जोर दिला आहे. माडगूळकर, खांडेकर यांनीही याच मताची री ओढली आहे. त्यांच्या मते, "प्रादेशिकता म्हटली की ती ग्रामीण वाङ्‌मयाला अपरिहार्य-पणे जवळ येते कारण प्रादेशिक म्हणून जी चित्रणे आजवर मराठीत आली आहेत ती सर्व ग्रामविषयक चित्रणे आहेत. म्हणूनच सर्व प्रादेशिक वाङ्‌मयाला ग्रामीण वाङ्‌मय या सदराखाली घेतले तरी, त्यात फारशी चूक होणार नाही."[१३]

"प्रादेशिक" आणि "ग्रामीण" या दोहोंतील फरक दाखविताना "ग्रामीण" साहित्य व्यक्तिनिष्ठ असते, तर प्रादेशिक साहित्य समूहनिष्ठ असते. प्रादेशिकतेची कादंबरीशी आणि कथेची ग्रामीणतेशी सांगड घालतात. वास्तविक "प्रादेशिक"ही संज्ञा मराठीत रूढ झाली ती वि.स. सुखठणकरांच्या "सह्याद्रीच्या पायथ्याशी" या कथासंग्रहाने. कथेच्या

आणि कादंबरीच्या अनुषंगाने "ग्रामीण" आणि "प्रादेशिक" या संज्ञा स्पष्ट करणे कसे अपुरे ठरते हे यावरून जाणवते. प्रादेशिकता ही ग्रामीण परिसराशी आजपर्यंत अविभाज्यपणे निगडीत झालेली आहे. ग्रामीण परिसर हा अद्यापी औद्योगिक शहरी संस्कृतीपासून बराचसा अलिप्त राहिलेला आहे. त्यामुळे त्याची प्राकृतिक वैशिष्टये अजून ब-याच प्रमाणात अ-विकृत राहिलेली दिसतात. त्यामुळेच ललित लेखकांच्या कुतुहलाचा आणि कौतुकाचा विषय बनतो. कोणत्याही भूप्रदेशाच्या अनन्यसाधारण व्यक्तिमत्त्वाला केंद्रस्थानी कल्पून त्या आधारे निर्मिलेल्या साहित्याला "प्रादेशिक" असे संबोधावे. खेडयाप्रमाणे शहरानाही त्याची अशी भौगोलिक आणि सांस्कृतिक वैशिष्टये असतातच. ही वैशिष्टये आपल्यापरीने "प्रादेशिक"च आहेत.

प्रादेशिकतेचे महत्त्व आणि वेगळेपणा विशद करताना रा.र. बोराडे लिहितात, "माणसाची कातडी बाजूला काढून जसा आपण माणसाचा विचार करू शकत नाही, तसाच तो विशिष्ट प्रदेश बाजूला ठेवून त्या प्रदेशातल्या व्यक्तीचा विचार करू शकत नाही. ज्या प्रदेशात जे जन्म घेतात, वाढतात त्या प्रदेशातला निसर्ग, तेथील लोकांचे आचार-विचार, सामाजिक संकेत या सर्वांचा संस्कार होऊनच त्यांचे जीवन घडत असते. इथल्या मातीने त्या व्यक्तिमनाला जन्म दिलेला असतो. त्याच्या नसानसातून ते पाणी मुरलेले असते. त्याच्या कातडीचा रंग देखील इथल्या हवामानानेच बनलेला असतो. त्यांच्या मनाचा धर्म इथल्या निसर्गाने घडवलेला असतो. पुढेमागे हा प्रदेश जरी सोडला तरी त्यांच्या मनावरचे हे धर्म पुसले जात नाहीत. प्रादेशिकता अपरिहार्य आहे ती याच अर्थाने."[१४]

मराठी समीक्षेत प्रादेशिक कादंबरी तर कधी ग्रामीण कादंबरी असे शब्दप्रयोग केले जातात. म्हणजेच ग्रामीण आणि प्रादेशिक या

संज्ञाच्याबाबत समीक्षकांमध्ये एकमत दिसत नाही. साहित्याच्या संदर्भात ग्रामीण व प्रादेशिक या संज्ञाची अर्थ निश्चिती करण्याचा येथे प्रयत्न केला आहे. ग्रामीण ही संज्ञा ग्रामविशिष्ट अर्थ प्रकट करण्यासाठी तर प्रादेशिक ही संज्ञा भूप्रदेशाविशिष्ट अर्थ प्रकट करणारी आहे. ग्रामीण या संज्ञेपेक्षा प्रादेशिक या संज्ञेची व्याप्ती अधिक मोठी असून ग्रामीणतेचा समावेश तीमध्ये होऊ शकतो. अशा प्रकारे ग्रामीण आणि प्रादेशिक या दोन्ही संज्ञा एकच आहेत. त्यांच्यात फारसा फरक नाही. प्रादेशिकतेत ग्रामीणत्वाशी काही बाबतीत निश्चितच साम्य असते हे दिसून येते.

## सारांश:

या प्रकरणात आपण कादंबरीचे स्वरूप, व्याख्या पाहिल्या. त्यामध्ये कादंबरी या वाङ्मय प्रकाराबद्दल मतऐक्य नसल्यामुळे कादंबरी या शब्दाबाबत तसेच कादंबरीच्या व्याख्याबाबत मत भिन्नता दिसून येते. पण भालचंद्र नेमाडे यांची व्याख्या, "कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्रांचे अनेकपदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेली आहेत, अशी साहित्यकृती असते". या व्याख्याद्वारे कादंबरी वाङ्मयात व्यापक जीवनाचे दर्शन कसे घडते हे दिसून आले. त्यामुळे कादंबरी ही कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरण, भाषाशैली या चार घटकावर आधारलेली दिसते. या चार घटकांचा आधार घेऊन मराठी कादंबरीचा उगम, वाटचाल व विकास होत गेलेला आहे. पण सुरवातीच्या कादंबरीमध्ये रूढ पध्दतीचे कथानक होते. ते नंतरच्या कादंबरीमध्ये कथानकात फरक होत गेलेला आहे. तर आजच्या कादंबरीकारांनी कथानकाची मात्तबरी मानलेली दिसूत नाही.

त्यानंतर ग्रामीण साहित्याची वैशिष्टये पाहात असतांना ग्रामीण जीवनाला ग्रामीण साहित्यात महत्त्वाचे स्थान असते. हे गो.मा. पवार

यानी ग्रामीण संवेदनशीलता या निबंधातून पटवून दिले आहे. म्हणून "ग्रामीण जीवनाचे, मनाचे चित्रण करणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य" हे त्यांचे म्हणणे पटते. पण ग्रामीण साहित्य आणि प्रादेशिक या संज्ञा बाबत समीक्षकांमध्ये मतऐक्य दिसत नाही. तरीसुध्दा ग्रामीण ही संज्ञा ग्रामविशिष्ट अर्थ प्रकट करते आणि प्रादेशिक ही संज्ञा विशिष्ट भूप्रदेश असा अर्थ प्रकट करते. त्यामुळे ग्रामीण या संज्ञेपेक्षा प्रादेशिक या संज्ञेची व्याप्ती अधिक मोठी असून ग्रामीणतेचा समावेश तिच्यामध्ये करता येतो. म्हणून मराठी समीक्षेत "प्रादेशिक कादंबरी" तर कधी ग्रामीण कादंबरी असा शब्दप्रयोग केला जातो. यावरून प्रादेशिक किंवा ग्रामीण साहित्याचे विशेष थोडक्यात खालीलप्रमाणे सांगता येतील.

ग्रामीण भागात असलेल्या समाजाची एक विशिष्ट भौगोलिक रचना असते. गावाची रचना, गावातील रीतीरिवाज हे परंपरेने चालत आलेले असतात. त्यामुळे सामुदायिकतेला महत्व असते. निसर्गचक्र, पाऊस-पाणी यांनाही महत्व असते. तसेच इथल्या लोकांच्या भाषेत जिव्हाळा असतो. त्यामुळे ती रोख-ठोक वाटते. कृषिकेंद्रित रचना हे इथल्या संस्कृतीचे वैशिष्ट्य असते. त्यामुळे त्यांचे जीवन एकमेकांवर आधारलेले असते. ग्रामीण लोक रूढीप्रिय असल्यामुळे रूढी, परंपरा याना महत्व असते. म्हणूनच अठरा-पगड जातीचे लोक येथे गुण्यागोविंदाने राहत असतात. एकत्र कुटुंबपध्दतीला येथे अनन्य साधारण महत्व असते त्यामुळे कुटुंब प्रमुखाला महत्व असते. एकत्र कुटुंब पध्दतीमुळे शेतीतील कामे भराभर करता येतात. म्हणून भौगोलिकता, निसर्ग, सामुदायिकता, बोली, कृषिजीवन, संस्कृती, खेड्याची रचना, कुटुंबव्यवस्था हेच ग्रामीण साहित्याचे विशेष आहेत.

प्रादेशिक आणि ग्रामीण यात भेद मानावयाचा झाल्यास ग्रामीण या संज्ञेपेक्षा प्रादेशिक या संज्ञेची व्याप्ती मोठी आहे. प्रादेशिक वाङ्मयात

त्या - त्या प्रदेशातील ग्रामीण जीवनाचे समूहदर्शन अभिप्रेत आहे. आणि ग्रामीण वाङ्मयात त्या त्या ग्रामीण विभागातील व्यक्तिनिष्ठ जीवन अपेक्षित असते असे जरी असले तरी प्रादेशिकतेमध्ये ग्रामीणतेचा समावेश होऊ शकतो. त्यामुळे त्यांच्यात फरक न दिसता, साम्यच दिसते. त्यामुळे "रणजित देसाई" यांच्या "बारी" आणि "माझा गाव" ह्या कादंबऱ्यामध्ये वरीलपैकी बरीच वैशिष्टये आढळतात. म्हणून आपण पुढील प्रकरणांत या दोन कादंबऱ्यांचे विशेष पहाणार आहोत.

.....

## प्रकरण पहिले

## संदर्भ


१) भालचंद्र फडके, "प्रदक्षिणा" (भाग पहिला) सातवी आवृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे ३०.

२) चंद्रकांत बांदिवडेकर, "मराठी कादंबरी इतिहास" १९८९, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ. ५, ६.

३) प्र.वा. बापट व ना.वा. गोडबोले, "मराठी कादंबरीची वाटचाल", परिसंवाद पुणे, कुलकर्णी ग्रंथागार १९७२.

४) ना.सी. फडके, "मराठी कादंबरी वाटचाल" परिसंवाद पुणे.

५) श्री.मा. कुलकर्णी, "कादंबरी रचना" पृ. १५, उन्मेष प्रकाशन, नागपूर.

६) भालचंद्र नेमाडे, "कादंबरी परिसंवाद","मराठी साहित्य प्रेरणा व व स्वरूप", (१९५०-१९७५), संपादक गो.मा. पवार, म.द. हातकणंगलेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती १९८६,पृ.२४.

७) कुसुमावती देशपांडे, "मराठी कादंबरीचे पहिले शतक", मुंबई मराठी साहित्य संघ, गिरगाव, मुंबई - ४, पृ. १९४.

८) आनंद यादव, "ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या", मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, १९७९, पृ. ९.

९) गो.मा. पवार, "ग्रामीण संवेदनशीलता" सकाळ पुरवणी, १ ऑगस्ट १९८१.

१०) प्रा. स.शि. भावे, प्रस्तावना, "ग्रामीण साहित्य आणि वास्तव" आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथमावृत्ती, १९८१, पृ. ५.

११) तत्रैव, पृ. ३८.

१२) इंदूमती शेवडे, "मराठी कथा उद्गम व विकास" पृ. २८३.

१३) अंबादास माडगुळकर, सुर्यकांत खांडेकर, "ग्रामीण मराठी कथा", प्रस्तावना, पृ. ४४, ४५.

१४) रा.रं. बोराडे, "प्रतिष्ठान" नोव्हेंबर, डिसेंबर, पृ. ४५, ४६.

........